# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग


दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com


जा.क्र. 60/शि.वि./२०१६
दि. 12/०१/२०१६

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- जानिये संक्रामक रोगो के बारेमें - प्रदर्शनीस भेट देण्याबाबत.**

संदर्भ :- आरोग्य विभाग, म.न.पा., नागपूर यांचे माहितीपत्रकानुसार.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आरोग्य विभाग, म.न.पा., नागपूर व असोशिएशन फॉर रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग इन बेसीक सायन्स एज्यूकेशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर शहरातील पालक व विद्यार्थ्यांना संक्रामक रोगांबद्दल विस्तृत माहिती देण्याकरीता भव्य प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. संक्रामक रोग हे सुक्ष्म जीवामुळे होत असून हे रोग एका रोगीकडून दुसऱ्या लोकांकडे पसरत असतात. या रोगाबाबत अपुरी माहिती असल्यामुळे या रोगांचा प्रसार होवून महामारी पसरते. संक्रामक रोगांपासून बचाव करण्याकरीता याबाबतची माहिती सर्वांना देऊन या रोगांचा फैलाव रोखण्यासाठी या प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. यामध्ये २०० सचित्र पोस्टर्स असून यात संक्रामक रोगाबाबत झालेल्या विविध वैज्ञानिक शोधांची माहिती दिलेली आहे. जसे मलेरीया, डेंगू, चिकणगुनिया, फ्लू, स्वाईन फ्लू, कॉलरा, टि.बी.,एच.आय.व्ही या रोगांची वैज्ञानिक माहिती दिली आहे. यामध्ये बॅक्टेरीया, वायरस, प्लाज्मोडीयम, मच्छर यांची माहिती, लघूपट, थ्रीडी मॉडेल्स यांचा समावेश करण्यात आला आहे.

तरी आपल्या शाळेतील इयत्ता ४ ते १२ मधील विद्यार्थ्यांना या प्रदर्शनीचा लाभ द्यावा. सदर प्रदर्शनी दि.११ जानेवारी ते १७ जानेवारी पर्यंत राष्ट्रभाषा भवन, उत्तर अंबाझरी मार्ग, रामदासपेठ, नागपूर येथे दूपारी १.०० ते रात्री ८.३० वाजेपर्यंत सुरू राहील. याबाबत विद्यार्थ्यांच्या पालकांनासुध्दा सूचना देण्यात याव्या. सदर प्रदर्शनी निशुल्क असून अधिक माहितीकरीता दुरध्वनी क्र. ०७१२-२५२३१६२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

pc;2/reshma /Tembhurne sir/letterT